सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २९८ | सोमवार, दि. २० जुलै २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
**आजचे भाव**

२४ सोने ९९.५०% : ₹ १४१३००
२२ सोने ९१.६०% : ₹ १२९९००
१८ सोने ७५.००% : ₹ १०८०००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २२३०/-
भाव प्रती १० ग्रॅम




**तापी : खानदेशच्या संस्कृतीची आणि समृद्धीची जीवनवाहिनी...!**

पान २ वर

# समाजातील दुर्बलांना नवदृष्टी देण्याचे कार्य गौरवास्पद : श्रीकांत धिवरे

## मंगळग्रह सेवा संस्था व आर. जे. शंकरा आय हॉस्पिटलतर्फे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर






*अमळनेर : येथील मंगळग्रह सेवा संस्था व पनवेल (जि. रायगड) येथील आर. जे. शंकरा आय हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. १९ जुलै रोजी सकाळी १० वाजता आयोजित भव्य मोफत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे दीप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांसमोर मनोगत व्यक्त करताना जळगाव जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे. शेजारी सौ. धिवरे, मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव सुरेश बाविस्कर, 'सीईओ' आर. जी. चव्हाण. दुसऱ्या छायाचित्रात नेत्र तपासणी करताना नेत्ररोगतज्ज्ञ.*



*नेत्र तपासणीसाठी उपस्थित नागरिक.*




*संत श्री सखाराम महाराज रोपवाटिकेतील विविध विभागांना भेट देऊन पाहणी करताना जळगाव जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे.*

### संत श्री सखाराम महाराज रोपवाटिकेची पाहणी

**जळगाव जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी सपत्नीक श्री मंगळग्रह मंदिर परिसरातील संत श्री सखाराम महाराज रोपवाटिकेस भेट देऊन गांडुळ खत प्रकल्प, गोवरी निर्मिती विभाग, निसर्ग सज्ज बैठक विभाग, गुलाब बाग, सेंद्रिय शेती, गोसेवा विभाग आदींची आतुरतेने पाहणी केली. यावेळी श्री. धिवरे यांनी मंगळग्रह सेवा संस्थेच्या या अभिनव उपक्रमाबद्दल सविस्तर माहिती जाणून घेतली. त्यानंतर त्यांनी उपक्रमाचे तोंडभरून कौतुक केले.**

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : समाजातील दुर्बल घटकांतील अनेकांना विविध आरोग्यविषयक समस्यांवर मात करताना आर्थिक स्तरावर मोठी कसरत करावी लागते, हे आपणा सर्वांना माहीतच आहे. मात्र, सामाजिक बांधिलकी जोपासत दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी मंगळग्रह सेवा संस्था व पनवेल (जि. रायगड) येथील आर. जे. शंकरा आय हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने अगदी मोफत स्वरूपात भव्य मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबीर आयोजित केले जाते. गेल्या काही दिवसांत जवळपास बाराशेपेक्षा अधिक रुग्णांवर यशस्वीरित्या मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येऊन त्यांना नवदृष्टी देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या दोन्ही संस्थांनी केले आहे. ही बाब अतिशय गौरवास्पद आहे, असे मत जळगाव जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी व्यक्त केले.

येथील मंगळग्रह सेवा संस्था व पनवेल (जि. रायगड) येथील आर. जे. शंकरा आय हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. १९ जुलै रोजी सकाळी १० वाजता आयोजित भव्य मोफत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव सुरेश बाविस्कर व 'सीईओ' आर. जी. चव्हाण उपस्थित होते.

शिबिरादरम्यान नेत्रतज्ज्ञ डॉ. गुरुप्रीतसिंग राठोड, डॉ. विजय बाम्हणे, डॉ.अनिल मुंडे तसेच सहाय्यक प्राची गायकवाड, नेत्रा गोडवे यांनी नागरिकांची तपासणी केली. एकूण १३७ नागरिकांनी शिबिरात सहभाग नोंदविला. सखोल वैद्यकीय तपासणीनंतर ७२ रुग्ण मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरले. पात्र रुग्णांची आवश्यक कागदपत्रे व वैद्यकीय नोंदी पूर्ण करण्यात आल्या. तत्पूर्वी नेत्रतज्ज्ञांचा रुग्णांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. संस्थेच्या वतीने पात्र ठरलेल्या सर्व रुग्णांना मोफत शस्त्रक्रियेसाठी पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली. हे सर्व रुग्ण सायंकाळी पाचच्या सुमारास श्री मंगळग्रह मंदिरातून पनवेलकडे रवाना झाले.

शस्त्रक्रियेसह आवश्यक वैद्यकीय सुविधा आणि पुढील उपचारांची व्यवस्था संबंधित रुग्णालयामार्फत करण्यात येणार आहे. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी मंगळग्रह सेवा संस्थेचे विश्वस्त मंडळ, सेवेकरी तसेच वैद्यकीय पथक यांनी विशेष परिश्रम घेतले. नागरिकांनीही अशा सामाजिक उपक्रमांचे स्वागत करत भविष्यातही अशाच आरोग्यविषयक शिबिरांचे आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी मंगळग्रह सेवा संस्था सातत्याने कार्यरत आहे. त्या अनुषंगाने दर महिन्यातील तिसऱ्या रविवारी भव्य मोफत मोतीबिंदू शिबिराचे आयोजन केले जाते. भविष्यातही विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविणे सुरूच राहील, अशी ग्वाही मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांनी याप्रसंगी दिली. सहसचिव दिलीप बहिरम यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.

# विद्यार्थ्यांनो, मेहनत, कष्ट व चिकाटीतून यशाचा आलेख उंचवा

## नगराध्यक्ष डॉ. बाविस्कर : जी. एस. हायस्कूलचा ८८ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



*अमळनेर : खानदेश शिक्षण मंडळ संचलित जी. एस. हायस्कूलच्या ८८ व्या वर्धापन दिनानिमित्त लोगोच्या फुगे आकाशात सोडताना नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर. शेजारी खानदेश शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष नीरज अग्रवाल, प्रताप महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. ए. बी. जैन व संस्थेचे अध्यक्ष विनोद अग्रवाल तसेच खानदेश शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष कमल कोचर, श्रीमती माधुरीताई पाटील, विश्वस्त सौ. वसुंधराताई लांडगे, कार्योपाध्यक्ष जितेंद्र जैन, शाळेचे चेअरमन हरी भिका वाणी, संचालक डॉ. संदेश गुजराथी, योगेश मुंदडा, सौ. लीनाताई पाटील, संस्थेचे देणगीदार अभिजीत भांडारकर, विवेकानंद भांडारकर, निलेश भांडारकर, अनिल वैद्य, प्रताप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव, संस्थेचे सेक्रेटरी प्रा. पराग पाटील, सहचिटणीस प्रा. डॉ. व्ही. बी. मांटे, संस्थेचे शिक्षक प्रतिनिधी आर. जे. पाटील, द्रौ. रा. कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका सूर्यवंशी, र. सा. पाटील शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. स्वप्नाताई शिसोदे, प्रताप हायस्कूलच्या मुख्याध्यापिका सौ. बाविस्कर, शाळेचे मुख्याध्यापक विनोद पाटील, उपमुख्याध्यापक ए. डी. भदाणे, पर्यवेक्षक एस. आर. शिंगाणे, शिक्षक प्रतिनिधी प्रशांत काटकर, पालक–शिक्षक संघाचे उपाध्यक्ष भूषण भदाणे आदी.*

अमळनेर : शाळा हे फक्त शिक्षणाचे नव्हे, तर संस्कारांचे देखील मंदिर आहे. शालेय जीवनात सुप्त गुणांना वाव मिळत असतो. मेहनत, कष्ट व चिकाटी या त्रिसूत्रीद्वारेच विद्यार्थ्यांच्या यशाचा आलेख उंचावत असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या त्रिसूत्रींचा जीवनात अवलंब करावा, असे आवाहन येथील नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांनी केले. मी सुद्धा जी. एस. हायस्कूलचा माजी विद्यार्थी असल्याचा मला अभिमान असून, शाळा व संस्थेच्या हितासाठी माझे नेहमीच सहकार्य राहील.

येथील खानदेश शिक्षण मंडळ संचलित जी. एस. हायस्कूलच्या ८८ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. खानदेश शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष नीरज अग्रवाल, प्रताप महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. ए. बी. जैन व संस्थेचे अध्यक्ष विनोद अग्रवाल तसेच खानदेश शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष कमल कोचर, श्रीमती माधुरीताई पाटील, विश्वस्त सौ. वसुंधराताई लांडगे, कार्योपाध्यक्ष जितेंद्र जैन, शाळेचे चेअरमन हरी भिका वाणी, संचालक डॉ. संदेश गुजराथी, योगेश मुंदडा, सौ. लीनाताई पाटील, संस्थेचे देणगीदार अभिजीत भांडारकर, विवेकानंद भांडारकर, निलेश भांडारकर, अनिल वैद्य, प्रताप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव, संस्थेचे सेक्रेटरी प्रा. पराग पाटील, सहचिटणीस प्रा. डॉ. व्ही. बी. मांटे, संस्थेचे शिक्षक प्रतिनिधी आर. जे. पाटील, मंगळग्रह संस्थेचे सचिव सुरेश बाविस्कर, निवृत्त शिक्षक दिलीप बहिरम, एस. एन. पाटील, ए. आर. बडगुजर, नंदवे, द्रौ. रा. कन्याशाळेच्या मुख्याध्यापिका सूर्यवंशी, र. सा. पाटील शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. स्वप्नाताई शिसोदे, प्रताप हायस्कूलच्या मुख्याध्यापिका सौ. बाविस्कर, शाळेचे मुख्याध्यापक विनोद पाटील, उपमुख्याध्यापक ए. डी. भदाणे, पर्यवेक्षक एस. आर. शिंगाणे, शिक्षक प्रतिनिधी प्रशांत काटकर, पालक–शिक्षक संघाचे उपाध्यक्ष भूषण भदाणे आदी व्यासपीठावर होते.

पान २ वर



## संपादकीय

# प्रगत महाराष्ट्रातील डिजिटल अंधार

भारताला विकसित देश म्हणून प्रस्थापित होण्याची ओढ लागली आहे. २०४७ पर्यंत म्हणजे स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षापर्यंत जागतिक स्तरावर भारत हा विकसित देश म्हणून प्रस्थापित होईल. अशा प्रकारचा आशावाद जागवला जातो आहे. त्यासाठी आर्थिक महासत्ता होणे हे अधिक महत्त्वाचे मानले गेले आहे. विकसित देशाचे जागतिक स्तरावरील जे निकष आहेत त्यात पायाभूत सुविधांची उपलब्धता, आर्थिक स्वयंपूर्णता, सर्वाधिक रोजगार क्षमता, देशाची आणि नागरिकांची सुरक्षितता आणि हे सर्व घडून येण्यासाठी सर्वाधिक साक्षरतासुद्धा आवश्यक मानली जाते. आताच्या बदलत्या काळानुसार साक्षरता म्हणजे केवळ लिहिता-वाचता येणे एवढाच त्याचा अर्थ घेतला जात नाही. तर गेल्या वीस वर्षांत तंत्रज्ञान ज्या वेगाने विकसित झालेले आहे त्याची तितक्याच वेगाने अंमलबजावणी करणे म्हणजे तंत्रज्ञानातील साक्षरता आणि कुशलता हीसुद्धा आता या साक्षरतेच्या व्याख्येमध्ये अंतर्भूत केली आहे. जगातील विकसित देशांनी यातील जवळपास ९९ टक्के निकष पूर्ण केलेले आहेत. भारतात मात्र ५० टक्के निकषही पूर्ण होऊ शकलेले नाहीत. जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश हे जरी भारताचे वैशिष्ट्य असले तरी संसदीय लोकशाही पद्धत स्वीकारून सामान्यातील सामान्य माणसाचे हितसंवर्धन करायला भारताच्या संविधानाने प्राधान्य दिलेले आहे. सर्वाधिक लोकसंख्या म्हटल्यानंतर त्या लोकसंख्येतील सर्वाधिक लोक हे नुसतेच साक्षर नाही तर तंत्रकुशलही झाले पाहिजेत. म्हणजेच यातील अधिकाधिक लोकांना संगणक, इंटरनेट किंवा डिजिटल व्यवहार करता येणे आवश्यक ठरते. विकसित देशाचे जे निकष आहेत त्यामध्ये केवळ पायाभूत सुविधा, औद्योगीकरण आणि आर्थिक स्वयंपूर्णता यांनाच महत्त्व देऊन चालणार नाही. खरेतर याची अतिशय प्राथमिक गरज म्हणजे भारताला शंभर टक्के साक्षर करता आले पाहिजे. त्या दिशेने भारताची वाटचाल दिसत नाही. अगदी देशातील जी काही प्रगत राज्ये म्हटली जातात तेथेसुद्धा या साक्षरतेचे उद्दिष्ट गाठता आलेले नाही.

केरळ हे भारतातील सर्वांत छोटे राज्य मानले जाते आणि तेथे जवळपास शंभर टक्के साक्षरता असल्याचे सांगितले जाते. छोट्या राज्याने साक्षरतेचे उद्दिष्ट साध्य करणे ही निश्चितच भूषणावह गोष्ट आहे. परंतु महाराष्ट्रासारख्या आकाराने मध्यम असलेल्या परंतु बऱ्याच बाबतीत सुधारणावादी किंवा प्रगत असणाऱ्या राज्यातही साक्षरता आणि शिक्षणाबाबत बराच अंधार असल्याचे सिद्ध झालेले आहे. अलीकडेच केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने देशभरातील शाळांबाबत माहिती देणारा अहवाल प्रसिद्ध केला. त्याला यू-डायस प्लस २०२५-२६ असे म्हटले गेले. त्यातून जे चित्र समोर आलेले आहे ते महाराष्ट्रातील तथाकथित प्रगतीचा फुगा फोडणारे ठरते. देशपातळीवर किंवा राज्यपातळीवर घरोघर वीज आणि जगातील सर्वाधिक डिजिटल व्यवहार करणारा देश म्हणून कौतुक होत असले, तरी भारतातील शाळांची अवस्था आजच्या या डिजिटल युगातही अंधारयुगासारखीच म्हणावी लागेल. आज राज्यात जवळपास एक लाख आठ हजार १३९ शाळा आहेत. त्यापैकी तीन हजार २०१ शाळांमध्ये वीजच पोहोचलेली नाही. स्वाभाविकपणे आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात या शाळांमध्ये संगणक, इंटरनेट किंवा आताच्या काळानुसार आवश्यक असलेल्या डिजिटल लायब्ररी उपलब्ध होऊ शकलेल्या नाहीत. यातील गंभीर भाग म्हणजे महाराष्ट्रातील दहा हजार ९३८ शाळांमध्ये वीज आहे पण ती उपयोगात आणली जात नाही. २३ हजार ८५५ शाळांमध्ये इंटरनेट नाही. याचा अर्थ शिक्षण या विषयाकडे अजूनही पुरेसे लक्ष दिले जात नसल्याचे म्हणावे लागेल. आजच्या या तंत्रज्ञान युगामध्ये संगणक किंवा इंटरनेट या अतिशय अनिवार्य बाबी ठरतात. परंतु या मूलभूत गोष्टींची जर उपलब्धता करून दिली जात नसेल तर राज्यातील जवळपास पंचवीस हजार शाळांमध्ये डिजिटल अंधारच आहे, असे म्हणावे लागेल. तंत्रज्ञानाबाबत शाळास्तरावर असलेली ही उदासीनता निश्चितच धक्कादायक ठरते. यावरून आदिवासी किंवा ग्रामीण भागामध्ये शाळांच्या इमारती आणि पुरेशा शिक्षकांची उपलब्धता याबाबतही निश्चितच अक्षम्य दुर्लक्ष झाले असणार, यात काही शंका नाही. याच उदासीनतेमुळे महाराष्ट्राची साक्षरता ७३ टक्क्यांपर्यंतच जाऊ शकली. निदान महाराष्ट्राच्या अमृतमहोत्सवापर्यंत ती ७५ टक्के तरी व्हावी.

विशेष म्हणजे एक लाखापेक्षा जास्त शाळांमध्ये जवळपास दोन कोटी १६ लाख ३२ हजार ६६९ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आणि सात लाख ५० हजार २७२ शिक्षक त्यांना शिकविण्याचे काम करतात. एकूण शाळांची संख्या, तेथील विद्यार्थ्यांची संख्या याचे प्रमाण पाहिले तर इतक्या मोठ्या शिक्षण व्यवस्थेबाबतही तितकीच मोठी उदासीनताही पाहायला मिळते. विकसित भारत किंवा विकसित महाराष्ट्र करायचा असेल तर तंत्रज्ञानाच्या दृष्टिकोनातून या शाळांमध्ये तितक्याच वेगाने तंत्रसाक्षरता उपलब्ध झाली पाहिजे. यासाठी या शाळांमधील शिक्षकदेखील तंत्रशिक्षणाने युक्त व्हावे लागतील. कारण तेच शिक्षक विद्यार्थ्यांना तयार करणारे ठरतात. महाराष्ट्राचा आपण अनेकबाबतीत प्रगत राज्य म्हणून उल्लेख करीत असतो. परंतु राज्यातील या शाळांमधील डिजिटल अंधार पाहिल्यानंतर खऱ्या विकसित महाराष्ट्राचे उद्दिष्ट अजून बरेच दूर आहे हे सिद्ध होते. जितका खर्च पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर होतो त्याच्या पाच ते दहा टक्के खर्च शाळांच्या विकासावर आणि पर्यायाने अधिकाधिक साक्षरता निर्माण करण्यावर केला गेला, तर तो अधिक मूलभूत स्वरूपाचा ठरेल. ज्या महाराष्ट्रामध्ये शिक्षणाबाबत महत्त्वाच्या चळवळी झाल्या. सावित्रीबाई फुले, शाहू महाराज, धोंडो केशव कर्वे अशा अनेकांनी शिक्षण व्यवस्था निर्माण करण्याकरिता पुढाकार घेतला. शिक्षण क्षेत्रातील सुधारणा घडवून आणणाऱ्या चळवळी महाराष्ट्रात सर्वाधिक झालेल्या आहेत. पण त्याच महाराष्ट्रात तंत्रज्ञानयुगामध्ये ही उदासीनता दाखविली जात असेल, तर ती शोकांतिकाच म्हणावी लागेल.


## विद्यार्थ्यांनो, मेहनत, कष्ट व चिकाटीतून यशाचा आलेख उंचवा

**पान १ वरून :** शाळेचे चेअरमन हरी वाणी यांनी शाळेच्या प्रगतीसाठी सतत प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. प्रताप महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. जैन यांनी शाळेला ५१ हजारांची देणगी दिली. तत्पूर्वी, कार्यक्रमाच्या सुरूवातीला वर्धापन दिनानिमित्त केक कापण्यात आला, तसेच शाळेचा लोगो फुग्यांचा सहाय्याने मान्यवरांच्या उपस्थितीत आकाशात सोडण्यात आला. मुख्याध्यापक विनोद पाटील यांनी अहवाल वाचन केले. उपमुख्याध्यापक भदाणे यांनी परिचय करून दिला. पर्यवेक्षक शिंगाणे यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी दहावी परीक्षा, विविध स्पर्धा परीक्षा तसेच क्रीडा क्षेत्रात प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सेवानिवृत्त शिक्षक बहिरम, व्ही. व्ही. कुलकर्णी, उद्योजक भावेश जैन, चेतन पाटील, उपशिक्षक एन. जे. पाटील, सी. आर. पाटील, प्रशांत काटकर, आर. जे. पाटील तसेच शाळेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गणवेश दिले.

कार्यक्रम यशस्वितेसाठी शाळेचे सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. ए. ए. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. पर्यवेक्षक के. पी. पाटील यांनी आभार मानले. विद्यार्थ्यांना खाऊ वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# तापी : खानदेशच्या संस्कृतीची आणि समृद्धीची जीवनवाहिनी...!



जन्मदिन विशेष

तापी नदी ही केवळ महाराष्ट्राच्या उत्तर सीमेवरून वाहणारी एक प्रवाह, जलधारा, वाहणारे गढूळ पाणी नसून ती खानदेशच्या मातीचा श्वास आहे. सातपुड्याच्या कुशीतून उगम पावणारी, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रातून प्रवास करत चैतन्याचे गाणे गात गुजरातच्या समुद्राला जाऊन मिळणारी ही नदी शेकडो वर्षांपासून मानवी संस्कृतीचे संगोपन करत आहे. सोमवार, दि. २० जुलै २०२६ रोजी तिचा जन्मदिवस यानिमित्ताने...

'सूर्यपुत्री' किंवा 'सूर्यकन्या' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तापी नदीचा उगम मध्य प्रदेशातील बैतुल जिल्ह्यातील 'मुलताई' येथून आहे. सातपुडा पर्वताच्या दुर्गम रांगांतून प्रवासाला सुरूवात करून सुमारे ७२४ किलोमीटरचा प्रदीर्घ प्रवास करताना ही नदी केवळ पाणीच वाहून नेत नाही, तर एका विशाल समृद्ध संस्कृतीचा इतिहास आपल्या पात्रात साठवून वाहते. ती जगप्रसिद्ध केळीच्या इतिहासाची साक्षीदार आहे आणि खानदेशच्या पिकांना जगभर ओळख मिळवून देते. तापीच्या काठावर वसलेली माणसे जेथे जातात तेथे आपल्या कष्टाची आणि समृद्धीची छाप सोडतात. तापीचे पाणी लोकांना पाजतात.

ही सूर्यकन्या तापी महाराष्ट्रातील जळगाव, धुळे आणि नंदुरबार या जिल्ह्यांमधून वाहते आणि या प्रदेशाला सुजलाम्-सुफलाम् करण्याचे महत्कार्य पार पाडते. ती चैतन्य पसरवते, सुख पेरते, माणसांची सुख-दुःखे आणि शासकीय धोरणांचे चढ-उतार आपल्या पात्रात सामावून घेते. वाटेत अडथळे आले तर ती अडखळते, पण मार्ग काढत पुढे जाते. गरज पडली तर ती जमिनीच्या पोटातून प्रवास करते, पण माणसे जगवते आणि जीवा-शिवाशी प्रामाणिक राहून आपला संसार करते. कवित्व शाबूत ठेवते. लेखकाला बोलते करते, राजकीय नेतृत्व उदयास घालते आणि जो प्रतारणा करतो त्याला मातीत गाळात दडपून टाकते.

तापीच्या काठावर वसलेली शेकडो गावे आणि शहरे आजच्या आधुनिक युगातही याच नदीच्या कृपेने भरभराटीला आली आहेत. विशेषतः अमळनेरसारखे ऐतिहासिक शहर तापीच्या सान्निध्यामुळेच जीवंत आणि हिरवेगार आहे. अमळनेरची तहान भागविण्याची क्षमता केवळ तापीचे पाणीच राखून आहे. नदी बारमाही प्रवाही राहत नसल्याने तापीचे अडविलेल्या पाण्याचे आवर्तन मिळावे यासाठी सध्या प्रयत्न आणि राजकारण दोन्ही सुरू आहे.

'तापी खोरे विकास' या मुद्यावर अनेक पुढारी उगवले, संपले, नवीन उगवू पाहत आहेत. पण तापी वाहतच आहे. अडवले तर थांबते मान देत. अनावर झाले तर उसंडी मारते. तापीला कुणी रोखू शकत नाही आणि सूर्यकन्येचा वापर करून कुणी स्वार्थ देखील साधू शकत नाही.

तापीच्या खोऱ्यातील काळी कसदार जमीन कापूस, केळी आणि ऊस यांसारख्या नगदी पिकांसाठी जगप्रसिद्ध आहे. नदीने वाहून आणलेल्या गाळामुळे या जमिनीला 'सुवर्णभूमी' म्हटले जाते. जळगाव जिल्ह्यातील रावेर, यावल, चोपडा, अमळनेर यांसारखी गावे आज केळीच्या उत्पादनात जागतिक स्तरावर ओळख निर्माण करत आहेत. नंदुरबार जिल्ह्यातील 'प्रकाशा' हे ठिकाण तापी, गोमती आणि अरुंधती या तीन नद्यांच्या संगमावर वसलेले असल्याने त्याला 'दक्षिण काशी' म्हणून गौरविले जाते. हे केवळ धार्मिक स्थळ नसून खानदेशच्या सांस्कृतिक वारशाचे प्रतीक आहे.

तापी नदीचा प्रवास हा संघर्ष आणि उत्कर्षाची एक गौरवगाथा आहे; परंतु काळानुसार निसर्गाचे चक्र बदलले आहे. पूर्वी बारमाही वाहणारी तापी आता मानवी हस्तक्षेप आणि वरच्या भागात बांधलेल्या धरणांमुळे खंडित झाली आहे. हे एक दाहक वास्तव आहे. आता अमळनेरसारख्या गावांना तापीचे पात्र तेव्हाच प्रवाही दिसते जेव्हा हतनूर किंवा वरील धरणांतून पाण्याचा विसर्ग केला जातो. उन्हाळ्यातील कडक दिवसांत याच धरणांतून सोडलेले पाणी तहानलेल्या गावांना आणि शेतीला जीवनदान देते.

तापीचा विकास केवळ आर्थिक नसून आध्यात्मिकही आहे. आश्विन शुद्ध सप्तमीला साजरी होणारी 'तापी जयंती' हे याचे सर्वांत मोठे उदाहरण आहे. या दिवशी तापी काठावरील संपूर्ण खानदेश भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघतो. लोक नदीला 'माता' मानून तिचे पूजन करतात. मुलताईपासून ते खंभातच्या आखातापर्यंत, नदीच्या प्रत्येक घाटावर पणत्यांची आरास केली जाते. नदीचे प्रदूषण कमी करणे, काठावर वृक्षारोपण करणे आणि भविष्यातील पिढ्यांसाठी हा जलस्रोत सुरक्षित ठेवणे, हा या जयंतीचा मूळ उद्देश आज समाजात रुजत आहे.

तापीच्या काठावरील संघर्ष केवळ नैसर्गिक नसून सामाजिकही राहिला आहे. रेल्वेचे जाळे आणि मोठे पूल बांधताना तापीच्या विशाल पात्राशी अभियांत्रिकी लढा द्यावा लागला होता. आज तापीवरील पूल जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांना जोडणारे दुवे आहेत. तसेच साखर कारखाने, सूतगिरण्या आणि इतर प्रक्रिया उद्योग तापीच्या पाण्यावरच आधारित आहेत. तापीने खानदेशला उद्योजकता दिली, कष्टाला फळ दिले आणि शिक्षणाचे व संस्कृतीचे केंद्र म्हणून नावलौकिक मिळवून दिला.

२१ व्या शतकात, हवामान बदलाच्या छायेत असताना तापी नदीचे महत्त्व अधिकच अधोरेखित होते. उन्हाळ्यात पात्र कोरडे पडते तेव्हा भूजल पातळी खालावते, हे वास्तव आपण अनुभवत आहोत. तापी केवळ एक नदी नसून ते खानदेशचे भविष्य आहे. तिचे संरक्षण करणे ही आता केवळ सरकारची जबाबदारी नसून ती एक लोकचळवळ बनली पाहिजे. आपल्या अंतःकरणात एकच प्रार्थना आहे की तापी पुन्हा एकदा नैसर्गिक प्रवाहाने बारमाही वाहू लागावी.

तापी ही खानदेशची खरी ओळख आहे. तिची संस्कृती, गाणी, सण आणि संपन्नता ही सर्वस्वी या सूर्यपुत्रीची देणगी आहे. तिने आपल्या पात्रात प्राचीन इतिहास साठवला आहे. ज्या दिवशी तापीचे पात्र निर्मळ आणि अखंड प्रवाही राहील त्याच दिवशी या परिसराचा खऱ्या अर्थाने उत्कर्ष होईल. तापी ही केवळ वाहते पाणी नसून तो खानदेशचा अखंड वाहणारा चैतन्य सोहळा आहे.

हे तापीमाई, तू सदैव चैतन्याचे गीत गात राहा! तुझे स्वागत आहे. तुला मुक्त खेळू-बागडू देण्यात आमच्याकडून अगणित चुका झाल्या आहेत, त्या कृपा करून पोटात घे. माते, तुला जन्मदिवसाच्या निमित्ताने अभिनंदन व भावी वाटचालीस अगणित शुभेच्छा...!

**- धनंजय सोनार, अमळनेर.**

# दरेगावच्या आकांक्षा पाटील यांची सहाय्यक अभियंदापदी नियुक्ती

### स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश; पाटील कुटुंबाची प्रेरणादायी कामगिरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : दरेगाव (ता. चाळीसगाव) येथील कु. आकांक्षा अशोक पाटील यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविले. त्यामुळे त्यांची महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागात, तर त्यांच्या लहान भगिनीची पाटबंधारे विभागात सहाय्यक अभियंदापदी नियुक्ती झाली आहे. कु. आकांक्षा पाटबंधारे विभागांतर्गत सध्या धुळे येथे अकाऊंटंट म्हणून कार्यरत अशोक दिनकर पाटील यांची कन्या, तर पाटबंधारे विभागातच अभियंता म्हणून कार्यरत ज्येष्ठ भगिनी सौ. कामिनी यांच्या लहान भगिनी आहेत. त्यांचा लहान भाऊही अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असून, तोही स्पर्धा परीक्षेची तयारी करीत आहे.

या दोन्ही भगिनींच्या यशामागे त्यांच्या मातोश्री सौ. विद्याताई अशोक पाटील यांचे मोलाचे योगदान आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल पाटील कुटुंबीयांवर नातेवाईक, मित्रपरिवार, शैक्षणिक, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. येथील प्रताप महाविद्यालयातील ग्रंथपाल प्रा. दीपक पाटील यांच्या या तिन्ही भगिनी मावसभाची असून, त्यांनीही या तिन्ही भगिनींचे मनस्वी अभिनंदन केले असून, त्यांना पुढील वाटचालीसाठी

# तांबेपुरात दुकानाबाहेरील लोखंडी साहित्याची चोरी

**संशयित तिघांविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


अमळनेर : येथील तांबेपुरा भागात ओळखीच्याच तिघांनी दुकानाबाहेर पडलेले नऊ हजार रुपये किमतीचे १५० किलो लोखंडी साहित्य चोरून नेल्याची घटना नुकतीच घडली. याबाबत दुकान मालकाने फिर्याद दिल्यावरून संशयित तिघांविरुद्ध पोलिसांत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या घटनेची माहिती अशी, की तांबेपुरा येथे नितीन गोकुळ कोळी (रा. रुबजीनगर) व अविनाश ज्ञानेश्वर पाटील (रा. तांबेपुरा) यांनी 'संदेश फॅब्रिकेशन' या नावाने वेल्डिंग दुकान भागीदारीत थाटले आहे. सद्यःस्थितीत त्यांनी अमळनेर पालिकेचे गटार चेंबर बनविण्याचे काम घेतले असल्याने त्यासाठी त्यांनी दि. २९ जून रोजी सकाळी ९ वाजता दुकानाबाहेर लोखंडी चेंबर व पाटे ठेवलेले होते. मात्र, सायंकाळी ते दोघे दुकानावर परत आले असता त्यांना दुकानाबाहेरील साहित्य दिसून आले नाही. त्यामुळे त्यांनी आजूबाजूला शोध घेतला असता त्यांना कुठेही हे साहित्य मिळून आले नाही. त्यांनी सूरज कंजर यांच्या घरावरील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असता त्यांना राकेश सुकलाल सोनवणे, विशाल धनराज मालचे, विजय देवा कार्लेकर (रा. मरीमाता मंदिराजवळ, बहादरपूर रोड, अमळनेर) हे सदर साहित्य नेताना दिसून आले. त्यात पाच हजार ८१३ रुपयांचे ९७ किलो लोखंडी अँगल व तीन हजार १९२ रुपये किमतीचे ५३ किलो लोखंडी पाटे होते. यासंदर्भात पोलिसांत फिर्याद देण्यात आली असून, हवालदार प्रमोद पाटील तपास करीत आहेत.

# महाराष्ट्र राज्य पीटीए क्लासेस संघटना कार्याध्यक्षपदी भैय्यासाहेब मगर

### अमळनेरच्या शिरपेचात खोवला गेला आणखी एक मानाचा तुरा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : येथील साई इंग्लिश ॲकॅडमी कोचिंग क्लासेसचे संचालक भैय्यासाहेब मगर यांची प्रोफेशनल टीचर्स असोसिएशन (पीटीए) महाराष्ट्र राज्य या प्रतिष्ठित संघटनेच्या कार्याध्यक्षपदी नुकतीच निवड झाली. त्यांच्या या निवडीमुळे अमळनेरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या दीर्घकालीन कार्याची, नेतृत्वाची आणि संघटन कौशल्याची ही दखल मानली जात आहे.

प्रोफेशनल टीचर्स असोसिएशन, महाराष्ट्र राज्य ही महाराष्ट्रातील कोचिंग क्लासेस संचालकांची सर्वांत जुनी, प्रतिष्ठित आणि शिखर संघटना म्हणून ओळखली जाते. सन २००० मध्ये स्थापन झालेल्या या संघटनेचे राज्यातील २९ जिल्ह्यांमध्ये कार्य असून, हजारो कोचिंग क्लासेस संचालक या संघटनेचे सभासद आहेत. शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्न, कोचिंग क्लासेसचे हित, शैक्षणिक गुणवत्ता आणि संघटनात्मक बळकटी यासाठी ही संघटना सातत्याने कार्यरत आहे. या नव्या कार्यकारिणीत सातारा येथील डॉ. पी. कुलकर्णी यांची अध्यक्षपदी, तर वाई येथील डॉ. नितीन कदम यांची सरचिटणीसपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्यासमवेत झालेली श्री. मगर यांची कार्याध्यक्ष म्हणून झालेली निवड ही उत्तर महाराष्ट्रासह अमळनेरसाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

श्री. मगर यांनी गेल्या अनेक वर्षांपासून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आणि कोचिंग क्लासेस क्षेत्राच्या प्रगतीसाठी सातत्याने उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि नेतृत्वाचा लाभ राज्यभरातील क्लासेस संचालकांना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. भैय्यासाहेब मगर यांच्या या मानाच्या निवडीबद्दल शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, विविध सामाजिक संस्था, शिक्षक, क्लासेस संचालक, विद्यार्थी आणि पालक यांच्याकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.



*अमळनेर : जळगाव जिल्हा पोलिस दलाच्या 'झीरो फॅटॅलिटी कॉन्सेप्ट' उपक्रमास हातभार लावत येथील लायन्स क्लबतर्फे उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते व पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्याकडे शहर पोलीस ठाण्यासाठी दोन फोल्डेबल स्ट्रेचर आणि दोन फर्स्ट एड किट बॉक्स भेट देताना अध्यक्ष जितेंद्र पारख, प्रोजेक्ट चेअरमन सुनील चौधरी, अभिषेक (राज) जैन, रजनीश वरलानी व प्रदीप पाटील. शेजारी सदस्य.*

# लायन्स क्लबतर्फे पोलिसांना स्ट्रेचर, फर्स्ट एड किट भेट

### 'झीरो फॅटॅलिटी कॉन्सेप्ट'ला बळ; पोलीस ठाण्यातील वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील रस्ते अपघातातील जखमींना सुवर्णक्षणात तातडीची मदत मिळावी आणि अपघातातील मृत्यूचे प्रमाण कमी व्हावे, या उद्देशाने जळगाव जिल्हा पोलिस दलाच्या 'झीरो फॅटॅलिटी कॉन्सेप्ट' उपक्रमास हातभार लावत लायन्स क्लबतर्फे शहर पोलीस ठाण्यास दोन फोल्डेबल स्ट्रेचर आणि दोन फर्स्ट एड किट बॉक्स भेट देण्यात आले. उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उपक्रम झाला. लायन्स क्लबने दिलेले स्ट्रेचर आणि प्रथमोपचार साहित्य पोलीस ठाण्याच्या दोन्ही शासकीय वाहनांमध्ये ठेवण्यात आले असून, अपघातस्थळी जखमींना सुरक्षितपणे हलविणे व तातडीचे प्रथमोपचार देणे आता अधिक सुलभ होणार आहे.

शहर व परिसरात होणाऱ्या रस्ते अपघातांमध्ये जखमींना मदत करताना स्ट्रेचर व प्रथमोपचार साहित्याची कमतरता जाणवत असल्याची बाब पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी लायन्स क्लबच्या पदाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली होती. या सूचनेची तत्काळ दखल घेत क्लबने सामाजिक बांधिलकी जपत आवश्यक साहित्य त्यांना उपलब्ध करून दिले.

> **"अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी अमळनेरच्या लायन्स क्लबने पोलिसांना स्ट्रेचर व फर्स्ट एड किट उपलब्ध करून दिले आहे. ही मदत म्हणजेच खऱ्या अर्थाने मानवतेची सेवा आहे. पोलीस ठाण्यात उपलब्ध झालेल्या या साहित्यामुळे अपघातग्रस्तांना त्वरित मदत करणे अधिक सुलभ होणार असून, समाजासाठी लायन्स क्लबने उचललेले हे पाऊल निश्चितच अनुकरणीय आहे.**
>
> **- विनायक कोते,**
> उपविभागीय पोलीस अधिकारी, अमळनेर.

यावेळी पोलीस निरीक्षक निकम यांनी अपघातग्रस्तांना वेळेवर मदत मिळणे हेच सर्वांत मोठे समाजकार्य असल्याचे सांगितले. लायन्स क्लबने दिलेल्या साहित्यामुळे जखमींना सुवर्णक्षणात मदत करणे अधिक प्रभावी होणार असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमानंतर पोलीस ठाण्याच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. वाढते प्रदूषण आणि पर्यावरणीय असंतुलन लक्षात घेता प्रत्येकाने वृक्ष लागवड करून त्यांचे संवर्धन करण्याची जबाबदारी स्वीकारावी, असा संदेश यावेळी देण्यात आला.

या उपक्रमासाठी लायन्स क्लबचे अध्यक्ष जितेंद्र पारख, प्रोजेक्ट चेअरमन सुनील चौधरी, अभिषेक (राज) जैन, रजनीश वरलानी आणि प्रदीप पाटील यांनी विशेष पुढाकार घेतला. डॉ. मिलिंद नवसारीकर, महेंद्र पाटील, एस. डी. भरुचा, जितेंद्र जैन, प्रशांत सिंघवी, शेखर धनगर, डॉ. रवींद्र जैन, रवींद्र कॉलरा, प्रकाश शहा, कुमारपाल कोठारी, प्रकाश जैन, चंद्रकांत महाजन, दिनेश मणियार, दिलीप गांधी, विनोद अग्रवाल, पोलीस उपनिरीक्षक भगवान शिरसाठ, नामदेव बोरकर, शरद काकळीज, हवालदार हितेश बेहेरे, सिद्धार्थ शिसोदे, भटूसिंग तोमर, प्रमोद पाटील, योगेश बागूल यांच्यासह लायन्स क्लबचे अनेक सदस्य उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com





# बॉलिवूडची पहिली ‘कोट्याधीश’ अभिनेत्री

## प्रत्येक निर्माता तिला आपल्या चित्रपटात घेण्यासाठी असायचा उत्सुक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय चित्रपटसृष्टीत अनेक अभिनेत्री होऊन गेल्या ज्यांनी आपल्या अभिनयाच्या जोरावर मोठे यश मिळविले. मात्र, आज आपण अशा एका अभिनेत्रीबद्दल जाणून घेणार आहोत ज्यांना भारतीय सिनेसृष्टीतील पहिल्या सुपरस्टार अभिनेत्रींपैकी एक मानले जाते. इतकेच नव्हे तर त्या बॉलिवूडमधील पहिल्या कोट्यधीश अभिनेत्री असल्याचेही म्हटले जाते.

**कोण होत्या कानन देवी?**

आपण ज्या अभिनेत्रीबद्दल बोलत आहोत त्या म्हणजे कानन देवी. कानन देवी या केवळ उत्कृष्ट अभिनेत्रीच नव्हत्या, तर त्या एक प्रतिभावान गायिकाही होत्या. आपल्या मधुर आवाजाने आणि दमदार अभिनयाने त्यांनी लाखो चाहत्यांची मने जिंकली. १९३० आणि १९४० च्या दशकात त्या सर्वाधिक लोकप्रिय आणि सर्वाधिक मानधन घेणाऱ्या अभिनेत्रींपैकी एक होत्या.

**किती मानधन घेत होत्या?**

माध्यमांतील वृत्तांनुसार कानन देवी एका चित्रपटासाठी तब्बल पाच लाख रुपये, तर एका गाण्यासाठी एक लाख रुपये मानधन घेत असत. त्या काळात अनेक चित्रपटांचे एकूण बजेटच अवघे १५ ते २० हजार रुपये असायचे. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नाच्या आधारे त्यांना त्या काळातील पहिली कोट्यधीश अभिनेत्री मानले जाते.

**कानन देवींबद्दल खास माहिती**

कानन देवी यांचा जन्म २२ एप्रिल १९१६ रोजी झाला. त्यांचा गोड आणि सुरेल आवाज लोकांना अक्षरशः मंत्रमुग्ध करून टाकायचा. अभिनयातही त्यांनी आपल्या प्रतिभेची छाप पाडली. ‘मुक्ती’, ‘विद्यापती’, ‘स्ट्रीट सिंगर’ आणि ‘जवाब’ हे त्यांचे गाजलेले चित्रपट आहेत.

**दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित**

कानन देवी इतक्या यशस्वी झाल्या होत्या की प्रत्येक निर्माता त्यांना आपल्या चित्रपटात घेण्यास उत्सुक असायचा. भारतीय चित्रपटसृष्टीतील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल भारत सरकारने त्यांना दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित केले.

**५७ चित्रपट आणि ४० गाणी**

वृत्तांनुसार कानन देवी यांनी एकूण ५७ चित्रपटांमध्ये अभिनय केला आणि सुमारे ४० गाणी गायली. पुरुषप्रधान चित्रपटसृष्टीत ‘मॅडम’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या त्या पहिल्या महिला होत्या. त्यांनी के. एल. सैगल, पंकज मलिक, प्रमथेश बरुआ, पहाडी सान्याल आणि अशोक कुमार यांसारख्या दिग्गज कलाकारांसोबत काम केले.

**वैयक्तिक आयुष्य**

कानन देवी यांनी डिसेंबर १९४० मध्ये अशोक मैत्र यांच्याशी विवाह केला होता. मात्र, त्यांचा संसार फार काळ टिकला नाही. १९४५ मध्ये दोघे विभक्त झाले.



# कावळा नेमका किती वर्षे जगतो?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

घराबाहेर पडलो किंवा घराच्या खिडकीत वा बाल्कनीत उभे असले तरी डोळ्यांसमोरून कितीतरी कावळे इकडून तिकडे उडताना दिसतात. चिमणीसारखा कावळा हा आपल्या रोजच्या जगण्यातील सगळ्यात ओळखीचा असा पक्षी आहे. लांब चोच, काळाभोर रंग असलेल्या या पक्ष्यावर कुणाचेही लगेच लक्ष जाते. खेडी-पाडी असोत, वा शहरे सगळीकडे कावळा दिसणार नाही असे होत नाही. बालपणी शाळेत आपण तहानलेल्या कावळ्याची गोष्टी नक्कीच वाचली असेल. यावरून हे समजते, की कावळा हा किती हुशार पक्षी आहे. भारतात सर्वाधिक आढळणाऱ्या कावळ्याला ‘हाऊस क्रो’ असे म्हटले जाते. अशात आज आपण पाहणार आहोत, की कावळ्यांचे आयुष्य किती असते.

**पहिले वर्ष असते सर्वाधिक कठीण**

कावळ्याच्या आयुष्यातील सर्वांत कठीण काळ म्हणजे त्याच्या जीवनातील पहिले वर्ष. या काळात त्याला शिकारी प्राणी, आजार आणि अन्नाच्या कमतरतेसारख्या अनेक संकटांचा सामना करावा लागतो. त्यामुळे सर्वच पिल्ले मोठे होतातच असे नाही.

**सुरक्षित वातावरणात वाढू शकते आयुष्य**

जर कावळ्यांना प्राणिसंग्रहालय किंवा इतर संरक्षित ठिकाणी सुरक्षित वातावरण मिळाले, तर त्यांचे आयुष्य अधिक वाढू शकते. काही कावळे २० वर्षांहून अधिक काळ जगल्याच्या नोंदी आहेत. योग्य आहार, वैद्यकीय सुविधा आणि कमी धोके हे त्यांच्या दीर्घायुष्याचे प्रमुख कारण मानले जाते.

**रॅव्हेन आणि कावळा यात आहे फरक**

अनेकदा लोक मोठ्या आकाराच्या ‘रॅव्हेन’ या पक्ष्यालाही सामान्य कावळा समजतात. मात्र, रॅव्हेन हा आकाराने मोठा असून त्याचे आयुष्य अधिक असते. नैसर्गिक वातावरणात तो १० ते २० वर्षे जगू शकतो, तर सुरक्षित वातावरणात त्याचे आयुष्य ४० वर्षांहून अधिक असू शकते.

**कावळ्याच्या इंटरेस्टिंग गोष्टी**

- कावळे माणसांचे चेहरे ओळखू शकतात आणि ते अनेक वर्षे लक्षात ठेवू शकतात.

- हे पक्षी समस्यांचे निराकरण करण्याची क्षमता असलेल्या सर्वांत बुद्धिमान पक्ष्यांपैकी एक मानले जातात.

- ते अन्न लपवून ठेवतात आणि गरज पडल्यास पुन्हा शोधून काढतात.

- कावळे आपल्या समूहातील इतर सदस्यांना धोक्याची माहिती विशिष्ट आवाजांद्वारे देतात.

- भारतीय घरकावळा हा जगातील अनेक देशांमध्ये आक्रामक प्रजाती म्हणूनही ओळखला जातो.

**कावळेही घेतात सूड**

२००६ मध्ये एक प्रयोग करण्यात आला होता. ज्याद्वारे टेस्ट करण्यात आले, की कावळेही सूड घेतात का? त्यांना एक मास्क चेहऱ्यावर लावला आणि मग ७ कावळ्यांना एका जाळ्यात अडकवले. पक्ष्यांची ओळख पटावी म्हणून त्यांना बँड बांधण्यात आले होते. काही वेळाने त्यांनी कावळ्यांना काहीच इजा न करता सोडून दिले. जॉनने दावा केला, की सोडून दिल्यानंतरही कावळ्यांनी त्यांचा पाठलाग सोडला नाही. जेव्हाही ते मास्क लावून यूनिव्हर्सिटीच्या कॅम्पसमधून निघत होते, तेव्हा कावळे त्यांच्यावर हल्ला करत होते.

एकूणच भारतीय कावळ्याचे ७ ते १५ वर्षांचे आयुष्य सर्वसाधारण मानले जाते. मात्र, त्याची बुद्धिमत्ता, स्मरणशक्ती आणि परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता यामुळे हा पक्षी इतर अनेक पक्ष्यांपेक्षा वेगळा ठरतो.

## पावसाळ्यात घ्यावयाची काळजी

**आहाराची काळजी**

**काय खावे? : उकळून थंड केलेले किंवा शुद्ध पाणी प्या. ताजे, गरम आणि स्वच्छ अन्न खा. आहारात आले, हळद, तुळस आणि लिंबू यांचा समावेश करा. मुगडाळ खिचडी, ओट्स, भाज्यांचे सूप आणि पेय पदार्थांचे सेवन करा.**

**काय टाळावे?**

**रस्त्यावरील उघडे अन्नपदार्थ आणि उघड्यावर कापलेली फळे टाळा. तळलेले, अतिशय तेलकट आणि मसालेदार पदार्थ टाळा, कारण यामुळे त्रास होऊ शकतो.**

**वैयक्तिक स्वच्छता**

**हात स्वच्छ धुवा: जेवणापूर्वी आणि बाहेरून आल्यावर साबणाने हात स्वच्छ धुवा.**
**कोरे कपडे: पावसात भिजल्यास त्वरित कोरडे कपडे परिधान करा.**
**दमट कपडे टाळा: ओले किंवा दमट कपडे वापरणे टाळा, कारण त्यामुळे बुरशीजन्य संसर्गाचा धोका वाढतो.**

**आजारांपासून बचाव**

**घरातील ओलावा टाळा: भिंती आणि कोपरे कोरडे ठेवा, डासांपासून संरक्षण करा.**
**योग्य कपडे: पावसात बाहेर जाताना छत्री किंवा रेनकोटचा वापर करा आणि स्वतःला कोरडे ठेवा.**
**पाण्यात साचू देऊ नका: साचलेल्या पाण्यापासून दूर राहा, कारण तिथे डास अंडी घालतात आणि डेंग्यूसारख्या आजारांचा धोका वाढतो.**
**टीप: पावसाळ्यात शुद्ध पाणी पिणे, गरम व ताजे अन्न खाणे, स्वच्छता राखणे आणि पावसापासून बचाव करणे हे आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.**

# पावसाळ्यात घरच्या घरी बनवा कुरकुरीत मिक्स भजी

## चव अशी की पुन्हा पुन्हा खाल



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पावसाळ्यात गरमागरम मिक्स भजी हा सगळ्यांच्या आवडीचा पदार्थ असतो. ही रेसिपी झटपट तयार होत असल्यामुळे सायंकाळच्या नाश्त्यासाठी बेस्ट पर्याय आहे.

**लागणारे साहित्य**

कांदा, बटाटा, हिरवी मिरची, लसूण, कोथिंबीर, बेसन आणि तांदळाचे पीठ या मुख्य साहित्याची आवश्यकता असते. यासोबत चाट मसाला, लाल तिखट, हळद, धणे पूड, जिरे, लिंबाचा रस आणि मीठ वापरले जाते.

**भज्यांची तयारी**

कांदा पातळ उभा चिरून घ्या आणि बटाटा जाड किसून तयार ठेवा. त्यामुळे भजीला योग्य पोत मिळतो आणि चवही जास्त वाढते.

**मिश्रण तयार करण्याची पद्धत**

सर्व साहित्य एका मोठ्या भांड्यात घालून हाताने व्यवस्थित एकजीव करून घ्या. मिश्रणात बेसन आणि तांदळाचे पीठ समान प्रमाणात पसरले आहे याची खात्री करा.

**तेल गरम करा**

कढईत पुरेसे तेल गरम करून मध्यम आचेवर ठेवा. तेल योग्य तापमानाला आल्यानंतरच भजी तळल्यास ती कुरकुरीत होतात.

**भजी तळताना घ्यायची काळजी**

मिश्रणाचे छोटे-छोटे गोळे किंवा भाग तेलात सोडा. एकावेळी जास्त भजी टाकू नका. त्यामुळे ती समान प्रमाणात तळली जातात.

**सोनेरी रंग येईपर्यंत तळा**

भजी दोन्ही बाजूंनी सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत तळा. नंतर अतिरिक्त तेल निघण्यासाठी टिश्यू पेपरवर काढून ठेवा.

**सर्व्ह करण्याची खास टिप**

गरमागरम मिक्स भजी हिरव्या चटणी, टोमॅटो सॉस किंवा गरम चहासोबत सर्व्ह करा. पावसाळ्यात हा स्वादिष्ट नाश्ता सर्वांनाच आवडतो.

**घरच्यांसाठी परफेक्ट स्नॅक**

ही मिक्स भजी कमी वेळात आणि कमी खर्चात तयार होते. अचानक पाहुणे आल्यास किंवा संध्याकाळच्या नाश्त्यासाठी ही रेसिपी उत्तम पर्याय ठरते.

# ३५ बार फेल होने पर भी नहीं मानी हार

## यूपीएससी परीक्षा पास कर आयपीएस से आयएएस बने विजय वर्धन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**सक्सेस स्टोरी**



किसी बड़े कॉम्पिटिटिव एग्जाम का रिजल्ट आते ही हर तरफ सिर्फ टॉपर्स की चर्चा होने लगती है। लेकिन सच तो यह है कि किसी भी सफलता की चमक के पीछे असफलताओं का बहुत लंबा और अंधेरा रास्ता होता है। हरियाणा के सिरसा जिले के रहने वाले आईएएस विजय वर्धन की कहानी भी कुछ ऐसी ही है। विजय वर्धन की यूपीएससी सिविल सेवा परीक्षा पास करने की राह इतनी कांटों भरी थी कि कोई भी आम इंसान होता शायद बीच में ही हिम्मत छोड़ देता।

आपके लिए यकीन करना मुश्किल होगा, लेकिन विजय वर्धन एक-दो नहीं, बल्कि पूरे ३५ सरकारी और कॉम्पिटिटिव एग्जाम्स में फेल हुए थे। हरियाणा पीसीएस, यूपी पीसीएस से लेकर एसएससी तक, उन्होंने जो भी परीक्षा दी, उसमें उन्हें नाकामी ही हाथ लगी। लेकिन इस जबरदस्त हार के बाद भी उन्होंने खुद को टूटने नहीं दिया। अपनी जिद और अटूट हौसले के दम पर उन्होंने न सिर्फ यूपीएससी की सबसे कठिन सिविल सेवा परीक्षा क्रैक की, बल्कि लगातार दो बार सफलता का परचम भी लहराया।

**इंजीनियरिंग से तय किया यूपीएससी तक का सफर**

हरियाणा के रहने वाले आईएएस विजय वर्धन ने इलेक्ट्रॉनिक्स इंजीनियरिंग की पढ़ाई पूरी करने के बाद एक बड़ा सपना देखा- देश की सबसे प्रतिष्ठित सेवा में जाने का। वे बीटेक की डिग्री लेकर दिल्ली आ गए और यूपीएससी सीएसई परीक्षा की तैयारी में जुट गए। दिल्ली आकर वे भी उसी भीड़ का हिस्सा बने जहां दिन-रात सिर्फ किताबों और यूपीएससी सिलेबस की बातें होती हैं। लेकिन उन्हें अंदाजा नहीं था कि उनकी असली परीक्षा पढ़ाई से ज्यादा उनके सब्र की होने वाली है।

**जब असफलताओं का लग गया अंबार**

यूपीएससी सिविल सेवा परीक्षा की तैयारी के साथ-साथ विजय ने बैकअप के तौर पर कई अन्य सरकारी नौकरियां के एग्जाम्स भी दिए। लेकिन किस्मत जैसे उनसे रूठी हुई थी। वे एक के बाद एक परीक्षाओं में फेल होते चले गए। जब नाकामी का आंकड़ा ३५ तक पहुंच गया तो अच्छे-अच्छों का हौसला डगमगा जाता। लेकिन विजय वर्धन ने रोने या किस्मत को कोसने में समय बर्बाद नहीं किया। उन्होंने हर फेलियर को सबक की तरह लिया और अपनी कमियों को सुधारना शुरू किया।

**यूपीएससी क्रैक कर बने आईपीएस, लेकिन नजरें थीं और ऊपर**

सालों की कठिन मेहनत और रातों की नींद उड़ाने के बाद आखिरकार साल २०१८ में विजय वर्धन की मेहनत रंग लाई। उन्होंने यूपीएससी सिविल सेवा परीक्षा में १०४वीं ऑल इंडिया रैंक हासिल की। इस शानदार रैंक के साथ वे आईपीएस अधिकारी बन गए। घर में खुशियां छा गईं, लेकिन विजय के मन में अब भी एक कसक बाकी थी। उनका असली लक्ष्य आईएएस अफसर बनना था। इसलिए उन्होंने आईपीएस की नौकरी के साथ भी अपनी पढ़ाई जारी रखी।

**आखिरकार पूरा हुआ आईएएस बनने का सपना**

आईपीएस अफसर बनने के बाद भी विजय वर्धन रुके नहीं और दोबारा परीक्षा देने का फैसला किया। साल २०२१ में उनकी जिद रंग लाई और उन्होंने एक बार फिर यूपीएससी क्रैक कर दिखाया। इस बार उन्हें अपनी आईएएस अफसर की कुर्सी भी मिल गई। विजय अक्सर मीडिया इंटरव्यू में कहते हैं कि इंसान का सबसे बड़ा और सबसे अच्छा टीचर वह खुद ही होता है। अपनी पुरानी गलतियों से सीखकर लगातार आगे बढ़ते रहेंगे तो दुनिया की कोई भी ताकत आपको सफल होने से नहीं रोक सकती।

### स्टूडेंट्स के लिए बड़ा संदेश

विजय वर्धन की सक्सेस स्टोरी आज देश के उन लाखों स्टूडेंट्स के लिए बहुत बड़ी सीख है जो एक या दो बार फेल होने पर ही डिप्रेशन में चले जाते हैं या तैयारी छोड़ देते हैं। विजय ने साबित कर दिया कि फेल होना सफर का अंत नहीं है, बल्कि सफलता की तरफ बढ़ने वाला सबसे बड़ा कदम है। यूपीएससी परीक्षा में कामयाबी सिर्फ टैलेंट के दम पर नहीं, बल्कि लगातार टिके रहने, खुद पर भरोसा रखने और कभी हार न मानने वाले जज्बे से मिलती है।

### आईएएस विजय वर्धन करेंट पोस्टिंग

आईएएस विजय वर्धन हिमाचल प्रदेश कैडर के अधिकारी हैं। वह रोहड़ू के एसडीएम रह चुके हैं। सरकार ने श्री विजय वर्धन, आयएएस (बैच २०२१) को नया दायित्व सौंपा है। वे अब निदेशक, सार्वजनिक वित्त और सार्वजनिक उपक्रम-सह-विशेष सचिव (वित्त), हिमाचल प्रदेश सरकार, शिमला के पद पर नियुक्त किए गए हैं। इसके अतिरिक्त उन्हें निदेशक, कोषागार, लेखा और लॉटरी, हिमाचल प्रदेश का अतिरिक्त प्रभार भी सौंपा गया है।

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे. सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोळा रोड, धुळे




# भगवान शंकरांच्या पूजेत ३ पानांच्या बेलपत्रालाच का महत्त्व?

## शिवलिंगाला बेलपत्र अर्पण करण्यामागील काय आहे श्रद्धा?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रावण महिना... शिवभक्त ज्या दिवसाची आतुरतेने वाट पाहत आहेत, तो महिना लवकरच सुरू होईल. धार्मिक मान्यतेनुसार हा महिना भगवान शिव यांची उपासना करण्यासाठी एक विशेष काळ समजला जातो आणि बेलपत्र शिवजींना अत्यंत प्रिय आहे. बेलपत्र भगवान शिवजींना अर्पण केल्याने महादेव प्रसन्न होतात आणि भक्तांच्या इच्छा पूर्ण होतात. यामुळे शिवपूजा पूर्ण होते. भगवान शंकरांच्या पूजेत ३ पानांच्या बेलपत्रालाच महत्त्व का आहे? शिवलिंगाला बेलपत्र अर्पण करण्यामागील श्रद्धा काय आहे? जाणून घेऊया...

**महादेवांच्या पूजेत ३ पानांच्या बेलपत्राचे काय महत्त्व आहे?**

वैदिक पंचांगानुसार यावर्षी श्रावण महिना १३ ऑगस्ट रोजी सुरू होईल आणि ११ सप्टेंबर रोजी श्रावण अमावस्येला समाप्त होईल. या संपूर्ण महिन्यात देशभरातील शिवमंदिरांमध्ये भक्तांची गर्दी असते. श्रावण महिना हा देवांचा देव असलेल्या भगवान शिवजींच्या उपासनेसाठी समर्पित आहे. काही जण महादेवांचा अभिषेक करतात, तर काही जण त्यांना त्यांच्या आवडत्या वस्तू अर्पण करतात आणि सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करतात. महादेवांच्या सर्व पूजा साहित्यांपैकी, बेलपत्र हे त्यांचे सर्वांत प्रिय आहे. शिवपूजेमध्ये याला विशेष महत्त्व



आहे. धार्मिक मान्यतेनुसार बेलपत्राचा उगम देवी लक्ष्मींच्या तपश्चर्येतून झाला आहे. म्हणूनच ते अत्यंत पवित्र मानले जाते. शिवपुराणासह अनेक ग्रंथांमध्ये भगवान शिवजींना बेलपत्र अर्पण करण्याच्या महत्त्वावर सविस्तर माहिती दिली आहे. बेलपत्र अर्पण केल्याने भगवान शिवजी लवकर प्रसन्न होतात आणि इच्छा पूर्ण होतात. तीन पानांचे बेलपत्र अनेकदा शिवलिंगाला अर्पण केले जाते. या अर्पणामागील श्रद्धा जाणून घेऊया.

**३ पानांच्या बेलपत्राचे महत्त्व**

धार्मिक मान्यतेनुसार तीन पानांच्या बेलपत्राला एक विशेष आध्यात्मिक महत्त्व असल्याचे म्हटले जाते. प्रत्येक पान भगवान शिवजींच्या तीन डोळ्यांचे प्रतीक आहे. भगवान शिवजींचे तीन डोळे ज्ञान, शक्ती आणि बुद्धीचे प्रतिनिधित्व करतात. असेही म्हटले जाते, की ते शिवजींच्या त्रिशूळाच्या तीन घावांशी संबंधित आहे, जे विश्वाचे संतुलन आणि संरक्षणाचे प्रतीक आहे. भगवान शिवजींना तीन पानांचे बेलपत्र अर्पण केल्याने त्यांची उपासना पूर्ण होते.


**३ पानांच्या बेलपत्राविषयीच्या श्रद्धा**

धार्मिक मान्यतेनुसार बेलपत्राची तीन पाने जगाच्या तीन गुणांचे प्रतिनिधित्व करतात. सत्व, रज आणि तम. सत्व गुण शुद्धता आणि ज्ञानाचे प्रतीक मानला जातो, रज गुण क्रियाशीलता आणि ऊर्जेचे, तर तम गुण स्थिरता आणि विश्रांतीचे प्रतीक आहे. काही श्रद्धांनुसार बेलपत्राची तीन पाने ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांचे प्रतिनिधित्व करतात. बेलपत्र निर्मिती, पालन आणि संहार या शक्तींचा सन्मान करते. ज्यामुळे ते शिवपूजेमध्ये आवश्यक ठरते.

# प्रदोष म्हणजे नक्की काय आहे?

## काय आहे प्रदोष व्रत महात्म्य? ते जाणून घेऊया

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



गुरुचरित्र ग्रंथात शनी प्रदोष व्रत महात्म्य आहे. त्याचे महत्त्व, सेवा, फलश्रुती हे जाणून घेणे महत्त्वाचे मानले जाते.

प्रदोष व्रत म्हणजे भगवान शिव यांचे पूजन होय. हे व्रत कलियुगामध्ये अतिशय मंगलमय आणि भगवान शिव यांची कृपा प्रदान प्रदान करणारे आहे. स्त्री अथवा पुरुष कोणीही स्वकल्याणासाठी हे व्रत करू शकतात. प्रदोष व्रत केल्याने आपले सारे विविध दोष नाहीसे होतात. प्रत्येक वारी येणाऱ्या प्रदोष व्रताचे महत्त्व असे आहे. ते केल्याने अनेक लाभ होतात.

१) रविवारी प्रदोष व्रत केल्यास आपले शरीर निरोगी राहते. सूर्यासारखे तेज प्राप्त होते.
२) सोमवारी प्रदोष व्रत केल्याने आपल्या मनातील इच्छा पूर्ण होते. पितृदोष जातो. आजारपण येत नाही. दीर्घआरोग्य लाभते.
३) मंगळवारी प्रदोष व्रत केल्याने आपणास रोगांपासून मुक्ती मिळते आपण स्वस्थ आणि समृद्ध राहतो. ऋणमुक्ती होते. कर्ज राहत नाही. पार्वती माता यांनी भगवान शिव हाच पती मिळावा म्हणून भौम प्रदोष व्रताचा उपवास केला होता.
४) बुधवारी प्रदोष व्रत केल्याने आपली कार्य सिद्धी होते.
५) गुरुवारी प्रदोष व्रत केल्याने शत्रूनाश होतो.
६) शुक्रवारी प्रदोष व्रत केल्याने सौभाग्याची वृद्धी होते.
७) शनिवारी प्रदोष व्रत केल्याने पुत्रप्राप्ती होते. साक्षात श्री दत्तप्रभू श्रीपाद श्रीवल्लभ यांचा अवतार याच व्रत पुण्याने झाला होता.

या व्रताने स्वर्गीय सुख मिळेल. श्रीसुत ऋषींनी सनकादी ऋषींना असेही सांगितले होते, की प्रदोष व्रताने मनुष्याचे सर्व प्रकारचे कष्ट दूर होऊन पापांपासून मुक्ती मिळेल. हे व्रत अति कल्याणकारी आहे. या व्रताच्या प्रभावाने शुभ आणि इष्ट गोष्टींची प्राप्ती होते.

**प्रदोष व्रत विधी**

प्रत्येक पक्षातील त्रयोदशीला प्रदोष व्रत येते. सूर्यास्त अगोदरची ४५ मिनिटे व नंतरची ४५ मिनिटे म्हणजे प्रदोष काळ.

या व्रतात भगवान शंकरांची पूजा केली जाते. या व्रतात व्रतस्थ व्यक्तीने निर्जल राहून उपवास करून व्रत करावयाचे असते. उपवास दुसऱ्या दिवशी सोडावा.

प्रातःकाळी स्नान करून भगवान शंकरांच्या पिंडीवर नित्यसेवा ग्रंथातील रुद्र किंवा शिवमहिम्न स्तोत्र वाचून अभिषेक करावा. महामृत्युंजय मंत्राचा शक्य तितका जप अभिषेक करून तीर्थ प्राशन करावे. तसेच यथासांग पूजा करावी. सायंकाळी प्रदोष समयी नित्यसेवा ग्रंथांतील शंकराची १०८ नावे घेऊन बेलपत्र वाहावीत. अशा रीतीने प्रदोष व्रत करण्याने व्रतस्थ व्यक्तीला महत पुण्यप्राप्ती होते. मनोवांछीत कामे पूर्णत्वास येतात.

# श्रीक्षेत्र कपिलेश्वर महादेव मंदिर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रीक्षेत्र कपिलेश्वर महादेव मंदिर हे पश्चिम वाहिनी सूर्यकन्या तापी व पांझरा या नद्यांच्या पवित्र संगमावर अमळनेर तालुक्यातील नीम या महसूल हद्दीत आहे. अकराव्या शतकामध्ये सांख्यशास्त्राचे जनक महर्षी कपिल महामुनी यांनी काही काळ या पवित्र जागेवर तपसाधना केली होती, असे संदर्भ आहेत. या तपसाधनेमुळे साक्षात भगवान महादेव स्वयंप्रकट झाले होते. कपिलमुनींनी महादेवांना या जागेवर ज्योतिर्लिंग रूपाने स्थापित केले. या ठिकाणी जो भाविक श्रद्धापूर्वक तापी नदीत स्नान करून महादेवाची साधना करेल त्याच्या आध्यात्मिक व भौतिक मनोकामना पूर्ण व्हाव्यात, असा वर त्यांनी भगवान महादेवांकडे मागितला. देवांनीही त्यांना तथास्तु म्हटले. तेव्हापासून सदर धार्मिक स्थळाचे 'श्रीक्षेत्र कपिलेश्वर महादेव' असे नामकरण झाले. प्राचीन काळापासून महाशिवरात्रीस महाराष्ट्र, गुजरात व मध्य प्रदेश येथून लाखो भाविक महाशिवरात्रीला भरणाऱ्या यात्रेस दर्शन व नवस फेडण्यासाठी येतात. देवाला वरण-बाटीचा नैवेद्य भक्तीभावाने अर्पण करतात. महाशिवरात्री यात्रोत्सव परंपरा होळीपर्यंत चालतो. यात्रेत सुमारे एक कोटी रुपयांची सहज उलाढाल होते. सदर यात्रा पांझरा नदीच्या विस्तीर्ण वाळूच्या प्रांगणात शिंदखेडा तालुक्यातील मुडावद येथे भरते. त्यामुळे तिला मुडावदची यात्रा असेही म्हणतात. मंदिर मात्र अमळनेर तालुक्यातील नीम येथे आहे. मंदिराची बांधणी घडीव, कोरीव व अखंड दगडामध्ये आहे. श्रीमंत लोकमाता राजे अहिल्यादेवी होळकर यांनी सदर मंदिराचा जीर्णोद्धार करून उत्कृष्ट शैलीत हेमाडपंथी वास्तुकरीचा उत्कृष्ट नमुना तयार करून घेतला आहे. मंदिराचा कळस जमिनीपासून ७१ फूट उंच आहे. सभामंडप १८ दगडी खांबांवर उभा आहे. नारोबा दादाजी



नेवाळकर यांनी १८८८ मध्ये दगडी घाट बांधून देवास अर्पण केला. टेहळणीसाठी मंदिराच्या समोर भव्य दगडी दीपमाळ बांधलेली आहे. शेकडो वर्षांपासून सदर बांधकाम जसेच्या तसे टिकून आहे. २००४ पासून महामंडलेश्वर स्वामी हंसानंद तीर्थ महाराज यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने विश्वस्त मंडळ मंदिराचा भौतिक व आध्यात्मिक विकास लोकसभागातून करीत आहेत. महर्षी दधिची यांच्या नावाने ३५ विद्यार्थ्यांची वेद पाठशाळा लोकसभागातून सुरू आहे. आतापर्यंत शेकडो विद्यार्थी या पाठशाळेतून मोफत शिक्षण घेऊन समाजात सर्वत्र आध्यात्मिक विचारांचा प्रचार-प्रसार करीत आहेत. ट्रस्टला इमारत निर्माण कार्यासाठी शासनाचे कुठलेही अनुदान मिळालेले नाही. मंदिरात राहणारे महंत व त्यांचे अनुयायी पाठशाळेच्या विद्यार्थ्यांसाठी राहण्याची सुविधा करण्याचा प्रयत्न करीत आहेत. मंदिराच्या नावाने एक गुंठा देखील जमीन नसल्याने तसेच इमारतीसाठी कोणती शासकीय अनुदान नसल्याने अनेक समस्यांना भाविक व विश्वस्त मंडळ तोंड देत आहे. कपिलेश्वर मंदिर ट्रस्टतर्फे महिला सबलीकरण, पंचक्रोशीमध्ये मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण आदी समाजोपयोगी कामे मोठ्या प्रमाणात केली जात आहेत. कपिलेश्वर महादेव मंदिर स्कंद पुराणातील संगमस्थळावरील भारतातील १०८ मंदिरांमधील एक मंदिर आहे हे विशेष! स्कंदपुराण व तापी महात्म्य ग्रंथांमध्ये मंदिराचा विस्तृत उल्लेख आलेला आहे. मंदिरात नारायण- नागबली, कालसर्पयोग, मातृ-पितृशांतीसह अनेक प्रकारचे विधी पुरोहितांमार्फत केले जातात. २००९ मध्ये अखिल भारतीय संत समितीचे अधिवेशन भारतातील शेकडो साधू संतांच्या उपस्थितीत व तीन जगद्गुरू शंकराचार्य यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्याचा मान कपिलेश्वर मंदिरास मिळालेला आहे.

# शिवलिंगासमोर तीनदा टाळी का वाजवली जाते?

## काय आहे यामागचे धार्मिक कारण जाणून घ्या!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवान शिवजींचे आशीर्वाद मिळविण्यासाठी भक्त नियमितपणे शिव मंदिरात जातात आणि शिवलिंगावर जलाभिषेक करतात. प्रदोषकाळी भगवान शिवजींची विशेष पूजा केली जाते. या काळात तुम्ही मंदिरात काही भाविकांना शिवलिंगासमोर टाळ्या वाजवताना पाहिले असेल. असे का केले जाते आणि त्यामागील विश्वास काय आहे हा प्रश्न अनेकांच्या मनात येतो. त्यामुळे शिवलिंगासमोर टाळ्या वाजविण्याचे महत्त्व, फायदे आणि शास्त्रीय नियम तपशीलवार जाणून घेऊया.

**धार्मिक कार्यात टाळ्या का वाजवतात?**

सनातन परंपरेत टाळ्या वाजवणे हे केवळ उत्साह व्यक्त करण्याची बाब नाही. तर आरती, भजन आणि कीर्तनादरम्यान आनंद, आदर आणि देवाशी संपूर्ण संवादाचे प्रतीक मानली जाते. जेव्हा भक्त टाळ्या वाजवून देवाची स्तुती करतात, तेव्हा त्यांचे मन, वाणी आणि शरीर पूजेत एकाग्र होतात असे मानले जाते. म्हणूनच सामूहिक भजन ते आरतीपर्यंत टाळ्या वाजवण्याला विशेष महत्त्व आहे.

**शिवलिंगासमोर टाळ्या का वाजवतात**

भगवान शिवजी हे ध्यान, मौन आणि समाधीचे देवता मानले जातात. तसेच ते नटराजच्या रूपातील दैवी ताल आणि सृष्टीच्या निनादचे देखील स्वामी आहे. त्यामुळे महादेवांच्या पूजेत ध्वनीला महत्त्वाचे स्थान आहे. धार्मिक मान्यतांनुसार आरतीदरम्यान घंटा, शंख आणि टाळ्या यांचा एकत्रित आवाज वातावरणाला सात्त्विक व प्रसन्न बनवतो. भक्तांचे मन एकाग्र करण्यासाठी देखील हा निनाद उपयुक्त मानला जातो. शिवलिंगासमोर टाळ्या वाजवण्याचा उद्देश भगवंताला जागृत करणे हा नाही, तर आपल्या आत दडलेली भक्ती, जागरूकता आणि सकारात्मक चेतना जागृत करणे हा आहे.

**शास्त्रांमध्ये टाळ्या वाजवण्याचा नियम काय आहे?**

शिवलिंगासमोर किती वेळा टाळ्या वाजवायच्या हे स्पष्ट आणि अनिवार्य नाही. कोणत्याही प्रमुख शैव ग्रंथांमध्ये हा मुद्दा स्पष्ट केलेला नाही. अशा परिस्थितीत पूजेच्या वेळी टाळ्या वाजवणे ही एक भावनिक श्रद्धा आहे, सक्तीचा धार्मिक नियम नाही. तथापि, तीन टाळ्या लोकपरंपरेत प्रतीकात्मक उल्लेख आढळतात. जर एखाद्या मंदिरात किंवा परंपरेत शांत मनोवृत्तीने ध्यान केले जात असेल, तर तेथे त्याच मर्यदाचे पालन करणे योग्य मानले जाते.

**तीन टाळ्यांचा अर्थ**

**पहिली टाळी :**

मनातील अहंकार, राग आणि नकारात्मक विचारांना देवाच्या चरणी सोपवण्याची भावना.

**दुसरी टाळी :**

भगवान शिवाला पूर्ण आदर, भक्ती आणि शरणागतीचे प्रतीक.

**तिसरी टाळी :**

तुम्हाला, तुमच्या कुटुंबाला, समाजाला आणि संपूर्ण सृष्टीला आनंद, शांती आणि समृद्धी मिळो या प्रार्थनेसाठी.

# कलियुगात माणसाचा स्वभाव कसा बदलत जाईल?

## कलियुगाचा अंत व्हायला किती वेळ शिल्लक? शिवपुराणातील उल्लेख जाणून थक्क व्हाल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कलियुग.... हिंदू धर्मातील चार युगांपैकी चौथे आणि शेवटचे युग मानले जाते. सत्ययुग, त्रेतायुग, द्वापरयुग आणि कलियुग अशी या युगांची क्रमवारी आहे. पुराणांनुसार श्रीकृष्णांनी पृथ्वीवरील अवतारकार्य पूर्ण केल्यानंतर कलियुगाची सुरूवात झाली, अशी धार्मिक मान्यता आहे. हिंदू धर्मग्रंथांमध्ये कलियुगाचे वर्णन विविध पुराणांत आढळते. शिवपुराणातही कलियुगात धर्माचा ऱ्हास, नैतिक मूल्यांची घसरण आणि मानवी स्वभावातील बदल यांचा उल्लेख आहे. हे वर्णन धार्मिक श्रद्धा आणि पुराणपरंपरेचा भाग आहे. पुराणांनुसार सध्या कलियुग सुरू आहे. अनेक ग्रंथांमध्ये या युगातील मानवी स्वभाव आणि सामाजिक परिस्थितीत होणाऱ्या बदलांचे वर्णन आहे. यापैकी शिवपुराणात कलियुगाच्या वैशिष्ट्यांची सविस्तर चर्चा केली आहे.

**कलियुगात माणसाचा स्वभाव कसा बदलत जाईल?**

शिवपुराणानुसार कलियुगात जन्मलेल्या प्रत्येकाचा अंत अटळ असतो. त्यामुळे कालचक्रातील युगांचे बदलणे हे देखील नैसर्गिक आहे. शिवपुराणातील विद्याश्वर संहितेच्या पहिल्या आणि दुसऱ्या अध्यायात कलियुगाच्या स्वरूपाचे सविस्तर वर्णन आहे. महर्षी सूत आणि ऋषीमुनी यांच्यातील



संवादात कलियुगाची सुरूवात, त्याची वैशिष्ट्ये आणि मानवी समाजात होणारे बदल यांचे वर्णन आहे. शिवपुराणानुसार जसा कलियुगाचा प्रभाव वाढतो तसा धर्माचा ऱ्हास होत जाईल. लोक सत्याचा त्याग करून खोटेपणा, कपट आणि लोभ यांसारख्या दुर्गुणांकडे वळतील. इतरांना दोष देणे, त्यांच्या संपत्तीचा लोभ धरणे आणि परस्त्रीलंपटपणा ही सामान्य वैशिष्ट्ये सांगण्यात आली आहेत.

**सत्यापेक्षा स्वार्थाला प्राधान्य**

शिवपुराणानुसार कलियुगात लोक स्वतःच्या फायद्यासाठी असत्य बोलतील आणि स्वार्थासाठी नातेसंबंधही विसरतील.

**लोभ आणि धनलालसा वाढेल**

शिवपुराणानुसार कलियुगात पैसा आणि संपत्तीला सर्वाधिक महत्त्व दिले जाईल. धर्म, सदाचार आणि प्रामाणिकपणा दुय्यम ठरू शकतो.

**राग आणि अहंकार**

शिवपुराणानुसार कलियुगात छोट्या-छोट्या गोष्टींवरून वाद, मतभेद आणि संघर्ष वाढतील. संयम कमी होईल.

**नात्यांमध्ये विश्वास कमी होईल**

शिवपुराणानुसार कलियुगात कुटुंबातील प्रेम, आदर आणि विश्वास कमी होऊन स्वार्थी वृत्ती वाढू शकते.

**धर्माचे बाह्य प्रदर्शन वाढेल**

शिवपुराणानुसार कलियुगात श्रद्धेपेक्षा दिखावा आणि प्रतिष्ठेसाठी धार्मिक कर्मकांड करण्याची प्रवृत्ती वाढेल, असे वर्णन आढळते.

**गुरू आणि ज्येष्ठांचा आदर कमी होईल**

शिवपुराणानुसार कलियुगात आई-वडील, गुरू आणि वडीलधाऱ्यांचा सन्मान कमी होऊन त्यांच्या सल्ल्याकडे दुर्लक्ष होईल.

**असत्य आणि फसवणूक वाढेल**

शिवपुराणानुसार कलियुगात प्रामाणिकपणापेक्षा कपट, फसवणूक आणि खोटेपणाचा प्रभाव वाढेल, असे पुराणात सांगितले आहे.

**मन अस्थिर राहील**

शिवपुराणानुसार कलियुगात चिंता, असंतोष, स्पर्धा आणि मानसिक अस्थिरता वाढेल. त्यामुळे मनःशांती मिळणे कठीण होईल.

**कलियुगाच्या अंतासाठी किती वेळ शिल्लक आहे?**

पुराणांनुसार कलियुगाच्या सुरूवातीपासून केवळ सुमारे ५००० वर्षे उलटली आहेत. कलियुगाचा एकूण कालावधी ४,३२,०० वर्षे असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे हिंदू धर्मग्रंथांनुसार कलियुगाच्या अंतापर्यंत लाखो वर्षे शिल्लक आहेत.

**कलियुगात मोक्षाचा मार्ग**

अनेक हिंदू धर्मग्रंथांमध्ये असे सांगितले आहे, की कलियुगात कठोर तपश्चर्येपेक्षा ईश्वरनामस्मरण, भक्ती, सत्कर्म, दान, सत्याचे पालन आणि धर्माचरण यांना अधिक महत्त्व आहे. भगवान शिव, विष्णू, श्रीराम किंवा श्रीकृष्ण यांच्या नामजपाने आणि निस्वार्थ भक्तीने आध्यात्मिक प्रगती साधता येते, अशी धार्मिक मान्यता आहे.



### शिवलिंगासमोर टाळ्या वाजवण्याचे फायदे

धार्मिक मान्यतांनुसार शिवलिंगासमोर टाळ्या वाजवल्याने मन पूजा आणि आरतीवर अधिक केंद्रित होते. भक्ती, उत्साह आणि सकारात्मक भावना मनात प्रफुल्लित होतात. तुमच्या सभोवती सकारात्मक वातावरण निर्माण होण्यास मदत होते. भक्ताचे लक्ष भगवान शिवावर अधिक केंद्रित असते.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)